महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३०५१ Email ID : napu22.mhpds@gov.in

---

क्रमांक : क्र. अधापु- २०२१/ प्र.क्र. १०/ना.पु.-२२ दिनांक : २२ जानेवारी, २०२१

प्रति

१) जिल्हाधिकारी, नाशिक, धुळे, जळगाव, नंदूरबार, अहमदनगर, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, लातूर, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ,नागपूर, वर्धा, गडचिरोली.

२) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक, धुळे, जळगाव,नंदूरबार, अहमदनगर, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, लातूर, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, गडचिरोली.

३) अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर, नागपूर.

विषय :- खरीप पणन हंगाम २०२०-२१ मध्ये किमान आधारभूत योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या भरडधन्याचे (मका, ज्वारी, बाजरी) लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतर्गत वितरण करणे व त्या दृष्टीने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत माहे फेब्रुवारी, २०२१ करिता दिलेल्या गव्हाच्या नियतनात सुधारणा करण्याबाबत.

संदर्भ :- अधापु २०२०/प्र. क्र. ३१/ नापु २२, दि. २५ नोव्हेंबर, २०२० व दि. ०७ जानेवारी, २०२१.

सन २०१६-१७ च्या खरीप पणन हंगामापासून विकेंद्रित खरेदी योजना संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. खरीप पणन हंगाम २०२०-२०२१ मध्ये भरडधान्य खरेदीचा कालावधी दिनांक १ नोव्हेंबर, २०२० ते दिनांक ३१ जानेवारी, २०२१ असा आहे. केंद्र शासनाच्या खरेदी धोरणानुसार विकेंद्रित खरेदी योजनेअंतर्गत आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत राज्यात खरेदी करण्यात आलेल्या भरडधान्याचे राज्यातच वाटप करावयाचे आहे. त्याअनुषंगाने राज्यात ज्या जिल्ह्यात भरडधान्य खरेदी करण्यात येणार आहे, त्याच जिल्ह्यामध्ये प्राथम्याने भरडधान्याचे अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना त्याचप्रमाणात

गव्हाचे परिमाण कमी करुन वाटप करावयाचे आहे. परंतु ज्या जिल्ह्यामध्ये भरडधान्याची खरेदी जास्त प्रमाणात झाली आहे त्या जिल्ह्यातील शिल्लक भरडधान्याचे वरीलप्रमाणे गव्हाचे परिमाण कमी करून इतर जिल्ह्यात वाटप करणे आवश्यक आहे.

३. त्यानुषंगाने संदर्भाधीन शासन पत्रान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत माहे फेब्रुवारी,२०२१ करिता दिलेल्या गव्हाच्या नियतनाचे परिमाण कमी करुन त्याऐवजी भरडधान्याचे नियतन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याबाबतचे विवरणपत्र "अ" सोबत जोडण्यात आले असून सदर विवरणपत्रात नमूद परिमाणानुसार गहू व भरडधान्याचे वितरण करण्यात यावे. संदर्भाधीन शासन पत्रान्वये दिलेल्या तांदळाचे परिमाण व नियतन कायम राहील.

४. खरीप पणन हंगाम २०२०-२०२१ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या भरडधान्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ पासून त्या प्रमाणात गव्हाचे नियतन कमी करुन वाटप करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

अ) भरडधान्याचे वाटप ज्या प्रमाणात करावयाचे आहे त्याप्रमाणात भारतीय अन्न महामंडळाकडून गव्हाची उचल कमी करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्यानुसार सदर **भरडधान्याचे वाटप माहे फेब्रुवारी, २०२१** पासून सुरु करावे.

ब) याबाबत हलगर्जीपणा झाल्यास संबंधितावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, असे सर्व संबंधितांना सूचित करावे.

क) सदर भरडधान्याचे वाटप केल्यानंतर, त्यानुसार एकूण गव्हाच्या नियतनाऐवजी वाटप केलेल्या भरडधान्य व गहू यांच्या उचल वाटपाबाबतची माहिती, ज्या परिमाणात भरडधान्य व गव्हाचे वाटप करण्यात आले आहे, त्याबाबतच्या तपशिलासह योजनानिहाय माहिती पुढील विववरणपत्रात शासनास napu२२.mhpds@gov.in या ई-मेलवर सादर करावी.

(आकडेवारी मे. टन मध्ये)

| महिना | शासनाने दिलेले गव्हाचे एकूण नियतन | | भरडधान्य वाटप करण्याकरिता गव्हाचे सुधारित केलेले नियतन | | ज्वारीचे नियतन | | मक्याचे नियतन | | बाजरीचे नियतन | | एकूण सुधारित नियतन (३+४+५+६) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | AAY | PHH | AAY | PHH | AAY | PHH | AAY | PHH | AAY | PHH | AAY | PHH |
| १ | २अ | २ ब | ३ अ | ३ ब | ४ अ | ४ ब | ५ अ | ५ ब | ६ अ | ६ ब | ७ अ | ७ ब |

५. आपल्या जिल्ह्यातील विद्यमान वाहतूकदारांकडून लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरिता विहीत केलेल्या दराने भरडधान्याची वाहतूक करण्यात यावी. वाहतूक खर्चाबाबत वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्या कार्यालयाकडून स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(मनोजकुमार सुर्यवंशी)
शासनाचे सह सचिव

सोबत:- विवरणपत्र

प्रत:-
१) महाव्यवस्थापक, भारतीय अन्न महामंडळ, दत्तपाडा, बोरीवली (पू), मुंबई ४०० ०६६.
२) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करावी.
३) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
४) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२३)

## खरीप पणन हंगाम 2020-21 मध्ये किमान आधारभूत योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या भरडधान्याचे वितरणाबाबतचे नस्ती क्र. अधापु 2021/प्र. क्र. 10/नापु-22 दि. .01.2021 च्या पत्रासोबतचे विवरणपत्र

| अ. क्र. | जिल्हा | माहे फेब्रुवारी, २०२१ करीता दिलेले गव्हाचे नियतन | माहे फेब्रुवारी, २०२१ करीता सुधारित नियतन | | | | मका | | ज्वारी | | बाजरी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | मका | ज्वारी | बाजरी | ज्या जिल्ह्यातून उचल करावयाची आहे तो जिल्हा | परिमाण | ज्या जिल्ह्यातून उचल करावयाची आहे तो जिल्हा | परिमाण | ज्या जिल्ह्यातून उचल करावयाची आहे तो जिल्हा | परिमाण |
| 1 | नाशिक | 134950 | 62159 | 53980 | 13495 | 5316 | नाशिक | 53980 | नाशिक | 2456 | नाशिक | 5316 |
| | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | जळगाव | 11039 | | |
| 2 | धुळे | 49810 | 23655 | 19924 | 4981 | 1250 | धुळे | 19924 | धुळे | 4981 | धुळे | 1250 |
| 3 | जळगाव | 99620 | 38436 | 39848 | 19924 | 1412 | जळगाव | 39848 | जळगाव | 19924 | जळगाव | 1412 |
| 4 | नंदूरबार | 30690 | 15073 | 12276 | 3069 | 272 | नंदूरबार | 12276 | नंदूरबार | 3069 | नंदूरबार | 272 |
| 5 | अहमदनगर | 102230 | 52090 | 40892 | 9248 | 0 | अहमदनगर | 40892 | धुळे | 3025 | 0 | 0 |
| | | | | | | | | | जळगाव | 6223 | 0 | 0 |
| 6 | पुणे (ग्रामीण) | 87420 | 66815 | 20605 | 0 | 0 | पुणे (ग्रामीण) | 7589 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | | 0 | 0 | जळगाव | 13016 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | सोलापूर (ग्रामीण) | 66640 | 39984 | 26656 | 0 | 0 | सोलापूर (ग्रामीण) | 26656 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | सोलापूर (शहर) | 16900 | 10140 | 6760 | 0 | 0 | सोलापूर (ग्रामीण) | 6760 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | कोल्हापूर | 82590 | 70517 | 12073 | 0 | 0 | सोलापूर (ग्रामीण) | 12073 | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | सांगली | 60330 | 51280 | 9050 | 0 | 0 | सांगली | 6128 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | | | | सोलापूर (ग्रामीण) | 2922 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | सातारा | 58540 | 49759 | 8781 | 0 | 0 | सातारा | 8781 | 0 | 0 | 0 | 0 |
| 12 | औरंगाबाद | 75750 | 45450 | 30300 | 0 | 0 | औरंगाबाद | 30300 | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | जालना | 50160 | 30096 | 20064 | 0 | 0 | जालना | 20064 | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | नांदेड | 76600 | 40351 | 30640 | 5609 | 0 | नांदेड | 3000 | नांदेड | 5609 | 0 | 0 |
| | | | | | 0 | 0 | औरंगाबाद | 27640 | 0 | 0 | 0 | 0 |
| 15 | बीड | 54310 | 27126 | 21724 | 29 | 5431 | बीड | 20190 | बीड | 29 | बीड | 5431 |
| | | | | | | | नाशिक | 1534 | 0 | 0 | 0 | 0 |
| 16 | परभणी | 41060 | 32724 | 0 | 4230 | 4106 | 0 | 0 | बुलढाणा | 4230 | बीड | 4106 |
| 17 | लातूर | 56090 | 29815 | 22436 | 0 | 3839 | नाशिक | 22436 | 0 | 0 | बीड | 3839 |
| 18 | अमरावती | 60070 | 31691 | 24028 | 4351 | 0 | अमरावती | 24028 | अमरावती | 4351 | 0 | 0 |
| 19 | वाशीम | 30440 | 15220 | 12176 | 3044 | 0 | बुलढाणा | 12176 | बुलढाणा | 3044 | 0 | 0 |
| 20 | अकोला | 39730 | 19865 | 15892 | 3973 | 0 | अकोला | 7975 | अकोला | 3973 | 0 | 0 |
| | | | | | 0 | 0 | बुलढाणा | 7917 | 0 | 0 | 0 | 0 |
| 21 | बुलढाणा | 59010 | 29505 | 23604 | 5901 | 0 | बुलढाणा | 23604 | बुलढाणा | 5901 | 0 | 0 |
| 22 | यवतमाळ | 62870 | 31435 | 25148 | 6287 | 0 | बुलढाणा | 25148 | यवतमाळ | 2252 | 0 | 0 |
| | | | | | 0 | 0 | 0 | 0 | बुलढाणा | 4035 | 0 | 0 |
| 23 | नागपूर (ग्रामीण) | 52490 | 31494 | 20996 | 0 | 0 | नागपूर (ग्रामीण) | 15089 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | | 0 | 0 | बुलढाणा | 5907 | 0 | 0 | 0 | 0 |
| 24 | नागपूर(शहर) | 49340 | 29604 | 19736 | 0 | 0 | बुलढाणा | 19736 | 0 | 0 | 0 | 0 |
| 25 | वर्धा | 34330 | 22106 | 12224 | 0 | 0 | बुलढाणा | 12224 | 0 | 0 | 0 | 0 |
| 26 | गडचिरोली | 19060 | 19033 | 27 | 0 | 0 | गडचिरोली | 27 | 0 | 0 | 0 | 0 |
| | एकूण | 1551030 | 915423 | 529840 | 84141 | 21626 | 0 | 529840 | 0 | 84141 | 0 | 21626 |

Government of Maharashtra
Food, Civil Supplies & Consumer Protection Department,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk.,
Mantralay Annex, Mumbai-400 032

Telephone: 022-22793051 Email ID : napu22.mhpds@gov.in

---

No.- ADHAPU-2021/C.R. 10/CS-22 Date :- 22nd January, 2021

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD Complex, Dattapada Road, Rajendra Nagar,
Borivali (E), Mumbai- 400 066.

Sub :- Revised Monthly Allocation of Foodgrains for Priority Households & AAY Category under NFSA, 2013 for the month of February, 2021.

Ref :- 1) State Govt. Letter no. ADHAPU-2019/C.R. 31/CS-22, Dtd. 25th November, 2020 & Dtd. 07th January, 2021.

Sir,

State Government has issued district wise allocation under NFSA Act, 2013 for the month of January, 2021 to March, 2021 vide above referred letter dated 25th November, 2020 & Dtd. 07th January, 2021. However, quantity of wheat allotted for the month of February, 2021 for some districts have been revised in order to distribute coarse grain procured in RMS 2020-21 vide letter dated 22nd Jan, 2021.

You are therefore requested to release the revised allocated quota for Priority households & AAY category to the nominees of District Collector's and Controller of Rationing, Director, Civil Supplies, Mumbai as per the statement attached under intimation to this Government.

Yours faithfully,

(Manojkumar Suryavanshi)
Joint Secretary to Government of Maharashtra

Copy to: 1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S & C.P. Dept, Mumbai.
2) Select file, Desk CS-22.